International Multilingual Research Journal ®

# Vidyawarta

Issue-20, Vol-11, Oct. to Dec.2017



Editor

Dr.Bapu G.Gholap

www.vidyawarta.com

Scanned with CamScanner

27) परभणी जिल्ह्यातील दलित लोकगीतांचे : संकलन आणि आकलन
प्रा.डॉ.संजय कसाब, पूर्णा (जं.) || 114

28) नांदेड जिल्ह्यातील नागरी सहकारी बँकांच्या सेवा विपणनातील सात मिश्र घटकांचा अभ्यास
प्रा. डॉ. एच.एस. पतंगे ,दिपाली हरीशंकर अंभोरे ,नांदेड || 119

29) प्राचीन भारतातील गुप्तकालीन सांस्कृतिक योगदान
डॉ. भामरे नानाजी दगा, अक्कलकुवा || 122

30) राज्यशास्त्र, मानसशास्त्र व ग्रॅहम वालास
डॉ.सिध्देश्वर सटाले, गेवराई || 125

31) योगचिकित्सा : रोगनिवारणामध्ये पारंपारिक व्यायाम पध्दती
डॉ.किरण वसंतअप्पा मोगरकर, देऊळगाव राजा - || 128

32) भारतीय औद्योगीकरणाच्या युगात वन स्रोतांचे व्यवस्थापन
प्रा.डॉ.मधुकर नक्षीणे, गडचिरोली || 131

33) देशीवाद : व्यापक सांस्कृतिक आणि मूल्यात्मक वाङ्मयीन परिप्रेक्ष्य
डॉ.नानासाहेब पवार, सासवड ||134

34) नयी कविता में दलित चेतना का अंत: संबंध'
डॉ. विजयकुमार एस.वैराटे, पैठण || 138

35) 'अंधेर नगरी' की मूल संवेदना : सत्ता एवं बाजार का गठजोड़
आशुतोष तिवारी, दिल्ली || 140

36) शिशु—अवस्था में व्यक्तित्व विकास के विविध पक्षों पर पूर्व विद्यालयीन शिक्षा
श्रीमती धर्मिश्ठा भोरवाल || 142

37) ''साहित्य सम्राट : प्रेमचंद''
मुल्ला आदम अली, तुरुपती || 146

38) इक्कीसवीं सदी में वैश्वीकरण और हिन्दी
सुमन सहारण, जयपुर || 147

39) भारतीय राष्ट्र की अवधारणा
डॉ. विवेकानन्द उपाध्याय, देवरिया (उ.प्र.) || 151



www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com
Scanned with CamScanner

यांशिवाय अमरसिंह, शबर, वसुबंधु, असंग, चंद्रकांतो यासारखे विद्वानही गुप्त काळातच होते.

शिल्पकला, स्थापत्यकला, चित्रकला, संगीत, नाट्य इत्यादी कलांचाही गुप्तकाळात खुपच विकास झालेला होता. एकंदरीत गुप्त सम्राटांनी सांस्कृतिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर योगदान दिलेले दिसून येते.

**संदर्भ साधने :-**

१) शर्मा रीता - प्राचीन भारत का इतिहास, वोहरा प्रकाशन नागपूर,१९९६, पृ. क्रं.३३३.
२) मोहरर्णीकर रा. श्री. विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, १९९०, पृ. क्रं. २४९.
३) शर्मा रीता - प्राचीन भारत का इतिहास, पूर्वोक्त पृ. क्रं. ३३५.
४) व्यास गोपाल व माथुर सी. के. - प्राचीन भारत, मलिक एण्ड कम्पनी नागपूर, १९९५, पृ. क्रं. ३३२.
५) शर्मा रीता - प्राचीन भारत का इतिहास, पूर्वोक्त पृ. क्रं. ३३५
६) उपरोक्त - पृ. क्रं. ३३५.
७) गायधनी र. ना. व राहूरकर व. ग. - प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, १९९४, पृ. क्रं. २८३.
८) उपरोक्त - पृ. क्रं. २८३.
९) व्यास गोपाल व माथुर सी. के. - प्राचीन भारत, पूर्वोक्त पृ. क्रं ३३०.
१०) उपरोक्त
११) उपरोक्त
१२) शर्मा रीता - प्राचीन भारत का इतिहास, पूर्वोक्त पृ. क्रं ३३७.
१३) गायधनी र. ना. व राहूरकर व. ग. - प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, पूर्वोक्त पृ. क्रं. २९८.
१४) पाठक अ. श. व जामखेडकर अ.प्र. - स्थापत्य व कला, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, शासकीय मुद्रणालय, औरंगाबाद, २००९, पृ. क्रं. १९५-१९६.
१५) गायधनी र. ना. व राहूरकर व. ग. - प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, पूर्वोक्त पृ. क्रं. २९१.
१६) उपरोक्त - पृ. क्रं. २९१-२९२.
१७) व्यास गोपाल व माथुर सी. के. - प्राचीन भारत, पूर्वोक्त पृ. क्रं ३३४.
१८) शर्मा रीता - प्राचीन भारत का इतिहास, पूर्वोक्त पृ. क्रं ३४२-३४३.
१९) उपरोक्त - पृ. क्रं. ३४१.
२०) गायधनी र. ना. व राहूरकर व. ग. - प्राचीन भारताचा सांस्कृतिक इतिहास, पूर्वोक्त पृ. क्रं. २९८-२९९.
२१) व्यास गोपाल व माथुर सी. के. - प्राचीन भारत, पूर्वोक्त पृ. क्रं ३३१.
२२) उपरोक्त - पृ. क्रं. ३३१-३३२.

**30**

# राज्यशास्त्र, मानसशास्त्र व ग्रॅहम वालास

डॉ.सिध्देश्वर सटाले
र.भ.अट्टल कला, विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, गेवराई

**प्रस्तावना :**

इंग्लंडमधल्या फेबियन सोसायटीमध्ये जे नानाविध विचारवंत निर्माण झाले त्यापैकी ग्रॅहम वालास हाही एक विचारवंत होऊन गेला. त्याचा जन्म इ.स.१८५८ मध्ये झाला. तो वयाच्या ७४ व्या वर्षी म्हणजे इ.स.१९३२ मध्ये मरण पावला. लंडनच्या कौन्टी कौन्सिलचा (महानगर पालिकेचा) काही काल तो लोकनियुक्त सभासद होता. इ.स.१८९५ ते १९२३ पर्यंत त्याने "लंडन स्कूल ऑफ् इकोनॉमिक्स ॲन्ड पॉलीटिकल सायन्स" मध्ये प्राध्यापक म्हणून काम केले. प्राध्यापक म्हणून त्याने चांगलाच नावलौकिक मिळविला. त्याने खूप लेखन केले. त्याचे महत्वाचे व गाजलेले ग्रंथ पुढीलप्रमाणे- १) ह्यूमन नेचर इन् पॉलीटिक्स- इ.स.१९०८ २) दि ग्रेट सोसायटी- इ.स. १९१२. ३) ऑवर सोशल हेरिटेज- इ.स.१९२१ ४) दि आर्ट ऑफ् थॉट- १९२६ व ५) सोशल जजमेंट- इ.स.१९३५. राज्यशास्त्राच्या दृष्टीने त्याचे महत्वाचे ग्रंथ म्हणजे 'ह्यूमन नेचर इन् पॉलिटिक्स' व 'दि ग्रेट सोसायटी' हेच होत.

राज्यशास्त्राच्या अध्ययनाला मानसशास्त्रीय सिध्दान्ताची जोड देण्याचे महत्वाचे कार्य ग्रॅहम वालासने केले. ही जोड देण्याचे कारणही उघडच होते. गेल्या शतकात लोकशाही संस्थाकडे, त्यांच्या काल्पनिक यशाकडे कित्येक विचारवंतांनी स्वप्नाळू दृष्टिकोनातून पाहिले. प्रत्यक्षात मात्र लोकशाही संस्थांना अनेक क्षेत्रात अनेक ठिकाणी अपयश येऊ लागले. या अपयशाची कारणमीमांसा करण्याची गरज निर्माण झाली. लोकशाही राज्याच्या यशापयशाची चर्चा फार मोठ्या प्रमाणात ॲरिस्टॉटले यापूर्वी केलीच आहे. तथापि, कालखंडात नगरराज्यातून लोकशाही होती; आजच्या इतका औद्योगिक आणि यांत्रिक विकास त्यावेळी झालेला नव्हता. ग्रॅहम वालासचे मानसशास्त्राकडे लक्ष जाण्याची आणखीही काही कारणे होती. पावलोव्ह, मॅग्डूगलसारख्या मानसशास्त्रातील ख्यातनाम व्यक्तींनी राज्यशास्त्र व मानसशास्त्र यांच्या परस्परसंबंधाबद्दल काहीच लिहिलेले नाही. किंबहुना एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंतही या विषयाकडे कोणाचे



Scanned with CamScanner

फारसं लक्ष घेण्यात गेले नव्हते. प्लेटो, ॲरिस्टॉटलसारख्या तत्त्वज्ञांनी माणसाच्या बुध्दिवादावर व विवेकीवृत्तीवर फार भर दिला. प्लेटो, ॲरिस्टॉटलपासून व्यक्तिवादी, उपयुक्ततावादी या सर्वांनी माणसाच्या बाबतीत काही गोष्टी गृहीत धरलेल्या आहेत. आपणाला हितकारक काय आहे याचा मानव विवेकी दृष्टीने मोजमाप करु शकतो, असे उपयुक्ततावाद्यांनी गृहीत धरले तर प्रत्येक मानवाला स्वहित कळते, असे व्यक्तिवाद्यांनी गृहीत धरले. मानव हा जसा विचारी आहे, तसा तो विकारीही आहे; भावना आणि मूलभूत प्रवृत्ती यांचा मानव हा गुलाम आहे. सारांश, मानवाच्या राजकीय जीवनाचा विचार करताना केवळ त्याची विवेकी, बुध्दीची बाजू विचारात घेऊन चालणार नाही. मानवाची ही अविवेकी, इंद्रियाधिष्ठित अशी बाजू म्हणजे भावना व मूलभूत प्रवृत्ती याचाही आवश्यक तो विचार केला पाहिजे. विशेषत: आजच्या राजकीय जीवनात, जेथे बहुसंख्य सामान्य जनांना आता महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे अशा राजकीय जीवनात, मानसिक भावनांना फार मोठे महत्व प्राप्त झाले आहे. आजच्या राजकीय नेत्यांवर व समाजावरही मानसिक ताण फार पडतो. राजकीय जीवनात हर्षामर्षाचे, पश्चात्तापाचे प्रसंग खूपच येत असल्यामुळे भावना प्रक्षुब्ध होणे या उल्हसित होणे असे प्रकार वारंवार घडतात.

**विश्लेषण :** गेल्या हजारो वर्षांत माणसाच्या ठिकाणच्या भावना व मूलभूत प्रवृत्ती ह्या कायमच्याच, तशाच राहिल्या आहेत (आणि अनंत कालापर्यंत त्या तशाच राहणार आहेत) परंतु मानवाच्या बाह्य परिस्थितीत मात्र क्रांतिकारक बदल झालेला आहे. हा बदल केवळ जड शास्त्रांमुळे झाला असे नाही. सामाजिक शास्त्रांनीही त्याला हातभार लावलेला आहे. बाह्य परिस्थितीत जो कमालीचा क्रान्तीकारक बदल झाला आहे त्याच्याशी जुळवून घेणे मानवाला कठीण जात आहे. प्रतीकांच्या निर्मितीमुळे तर मानव अधिकच गोंधळून गेला आहे. वस्तूच्या ठिकाणी नसलेल्या गुणवत्तेचे वलय जसे वस्तूच्या बाबतीत जाहिरातबाजीमुळे पडते तीच गोष्ट काही राजकीय सिध्दान्ताबाबत घडते. कृत्रिम प्रचारामुळे राज्यकर्ते व प्रजाजन यांच्या ठिकाणी असलेल्या व नसलेल्या गुणदोषांचे अतिरंजित चित्र रंगविले जाते. या काल्पनिक चित्रानेच माणूस खूष मानतो. एखाद्याची प्रतिमा समाजात उज्ज्वल राखणे किंवा एखाद्याचे चारित्र्यहनन करुन त्या जीवनातून उठविणे हा आजकालच्या वृत्तपत्रांच्या हातचा मळ बनला आहे. समाज वा मानव हा विवेकी आहे, या सिध्दान्तावर विश्वास ठेवणे फार कठीण जावे, नव्हे अशक्य व्हावे, अशा हजारो अविवेकी घटना समाजात, व्यक्तींच्या हातून घडत असतात. मानवाच्या मनोव्यापारातील विवेकी भाग असा मुळात फरक करणे फार कठीण आहे. मानवाच्या अविवेकी भागाचा (भावना व मूलभूत प्रवृत्ती यांचा) मानवी जीवनावर फार मोठा परिणाम होत असतो. मानवाच्या ठिकाणच्या अविवेकी भागाला सतत आवाहन करीत राहून राजकारणी नेत्याला शक्य असते. मानवाच्या अविवेकी भागाला सतत आवाहन करीत राहण्याचा आणखीही एक दुष्परिणाम होण्याची शक्यता आहे, तो म्हणजे ही भावना नियंत्रणाच्या पलीकडे जाण्याची भिती आहे.

जड शास्त्रांचे अध्ययन आणि राज्यशास्त्राचे अध्ययन (म्हणजे सामाजिक शास्त्रांचे अध्ययन या अर्थाने) यात जो फरक आहे, तोही या संदर्भात ठेवावयास हवा. राज्यशास्त्रात कोणत्याच दोन गोष्टींची शंभर टक्के पुनरावृत्ती कधीच होत नाही. राज्यशास्त्रात अनेकविध विचारप्रणाली व पर्याय आहेत. यामुळेच जीवशास्त्रीय पध्दतीचा अंगीकार राज्यशास्त्राच्या अध्ययनात करावा असे काहींना वाटते. जीवशास्त्रीय पध्दतीत उत्क्रान्तीचा सिध्दान्त, बदल व फरक या घटकांचा फार मोठा वाटा आहे. वालासला या पध्दतीचे महत्व वाटले, परंतु या पध्दतीचा संपूर्णपणे अंगीकार करावा असे मात्र त्याला वाटले नाही.

मानवाच्या अविवेकी भागाला- भावनेला- सतत आवाहन करीत राहून; मूलभूत प्रवृत्तींचा गैरफायदा घेऊन काही लबाड राजकारणी मंडळी त्यावर आपली पोळी भाजतील ही कल्पना वालासला आल्यामुळेच त्याने त्यावरचा उतारा सांगितला आहे. भावनांची, कल्पनांची ही राजकीय पिळवणूक होऊ नये यासाठी सर्वोत्तम उपाय म्हणजे आत्मनियंत्रण (Control for within) हाच होय. मानवाचे जर 'स्व' वर नियंत्रण नसेल तर बाह्य कोणतेच नियंत्रण पुरेसे ठरणार नाही. मानवाने स्वत:वर म्हणजेच स्वत:च्या अविवेकी प्रवृत्तींवर कसे नियंत्रण ठेवावे हे शिकविण्याचे कार्य उत्तम शिक्षणपध्दती करु शकेल, असे वालासला वाटते. भारतीय साधुसंतांनी मानवाच्या विकारी, इंद्रियनिष्ठ प्रवृत्तींना शत्रू मानून त्यांचे दमन करावे असा जो सतत उपदेश केला तोच या ठिकाणी सार्थ वाटतो. माणसाला खरे सुख भौतिक वस्तूंच्या वाढत्या पुरवठ्यामुळे प्राप्त होणार नाही, तर खरे सुख त्याला आत्मशांतीनेच मिळेल. हाही भारतीय साधुसंतांचा उपदेश याबाबतीत लक्षात ठेवण्यासारखा आहे. माणसाच्या या अविवेकी प्रवृत्तींचे महत्व लक्षात आल्याबरोबर कित्येक विचारवंतांची लोकशाही शासनपध्दतीवरील श्रध्दा डळमळू लागली. कारण लोकशाही शासनपध्दती ही मानव हा विवेकी प्राणी असून तो विवेकवृत्तीने आपल्या प्रतिनिधींची निवड करतो व निर्णय घेतो, असे गृहीत धरलेले असते. हे गृहीततत्त्वच बरोबर नाही, असे सिध्द झाल्यामुळे व अनुभवाला आल्यामुळे लोकशाही राज्यपध्दतीवरील श्रध्दा डळमळणे हे स्वाभाविकच आहे. याचा परिणाम म्हणून कित्येक विचारवंत जुन्या तत्त्वज्ञानाकडे वळण्याची शक्यता आहे तर काहींना या तत्त्वावरील लोकशाहीतील निवडणुकादि प्रकार म्हणजे एक फार्स वाटतो. राजकारणी



Scanned with CamScanner

मंडळी निर्णय आपोआप घेतात व त्यावर शिक्कामोर्तब करण्याचे कार्य निवडणुका करतात. परंतु एका बाजूला लोकशाहीतील हा संभाव्य अविवेकी भाग सोडला तर दुसऱ्या बाजूने काही विवेकी भाग शाबूत असल्याचे आढळून येते. प्रतिनिधिक लोकशाही राज्यपध्दतीत, जवळजवळ सर्वत्र, सनदी नोकरवर्गाची निवड खुल्या स्पर्धा परीक्षापध्दतीद्वारे घेण्यात येते. वरिष्ठ सनदी नोकरांची भरती, त्यांची बढती व त्यांना वरच्या जागा मिळण्याची संधी ह्या गोष्टी अजूनतरी संसदीय नियंत्रणाच्या खाली नाहीत. ही त्यातल्यात्यात समाधानाची गोष्ट आहे-खुल्या परीक्षास्पर्धा या नोकरशाहीतील वरिष्ठ जागांच्या बाबतच घेण्यात येतात. ग्रॅहम वालासचीच सूचना अशी की, या खुल्या स्पर्धा-परीक्षा-पध्दतीचा अंगीकार नोकरशाहीतील दुय्यम जागा भरण्यासाठीही करण्यात यावा. नोकरशाहीतील नोकरांना असलेली शाश्वती, बढती, पगारवाढ इत्यादि गोष्टी उपयुक्तच आहेत, असे वालासला वाटत होते.

आधुनिक कालातील मानवापुढे निर्माण झालेल्या भावनात्मक समस्येचे विवरण करण्याचा प्रयत्नही ग्रॅहम वालासने केला आहे. प्राचीन ग्रीक नगर राज्य हे मानवामानवातील परस्पर प्रेम. हे ग्रॅहम वालासने इ.स.१९०८ पूर्वी लिहिले आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. आता सनदी नोकरांची भरती ही वशिला, मंत्र्यांच्या लहरीनुसार बढती, यावर अवलंबून असते. भारतात तर सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या प्रमुखाची नेमणूक करण्यात "राजकारण" आले. लोकशाहीच्या या भव्य प्रगतीची कल्पना बिचाऱ्या वालासला नव्हती. सहकार्य व सामाजिक जाणीव यावर अधिष्ठित होते. मध्ययुगात मानवी भावनांवर नियंत्रण ठेवण्याचे व त्यांच्यातील एकात्मता कायम राखण्याचे कार्य धर्मसंस्थेने केले. अर्वाचीन कालात धर्मसंस्था मागे पडली व राष्ट्रवादाने त्याची जागा घेतली. राष्ट्रवादाने राजकीय दृढता निर्माण केली हे खरे, परंतु त्याचबरोबर विभक्तपणाही त्याने निर्माण झाला. छोटे छोटे मानवी समूह राष्ट्रीय भावनेने प्रेरित होऊन स्वतंत्र राजकीय जीवन जगू लागले. विसाव्या शतकात आणखीनची काही समस्या निर्माण झालेल्या आहेत. मानवी विकारांवर, मानवाच्या अविवेकी भागावर आंतरराष्ट्रवाद व मानवतावाद हे नियंत्रण ठेऊ शकतील का, या प्रश्नाचे उत्तर भावी कालच देईल. परंतु आजच्या संघर्षमय मानवी जीवनात परस्परविरोधी वृत्ती व शत्रुत्व यांच्याऐवजी विश्वबंधुत्वाची कास, विचारपूर्वक व प्रयत्नपूर्वक धरणे हे मानवाला हितकारक होईल असे ग्रॅहम वालासला वाटते.

शास्त्रीय ज्ञानाने मानवाच्या मूलभूत प्रवृत्तींचा, विकारांचा अभ्यास केला असला तरी सर्व सामाजिक शास्त्रांच्या अध्ययनात केवळ मानसशास्त्रीय पध्दतीचाच स्वीकार करण्यात यावा, असे वालासने म्हटलेले नाही. वालास हा एकांगी नाही, हे यावरून स्पष्ट होते. अन्य पध्दतीबरोबर याही पध्दतीचा- मानसशास्त्राचा विचार करण्यात यावा, एवढेच त्याचे म्हणणे आहे. त्यात मतभेद होण्याचे कारणच नाही. मात्र वालासने व्यवसायसंघ-समाजवाद, व्यक्तिवाद व समाजवाद यांचे मिश्रण करण्याचा जो प्रयत्न केला तो कितपत यशस्वी व्यवसायसंघ-समाजवाद, व्यक्तिवाद व समाजवाद यांचे मिश्रण करण्याचा जो प्रयत्न केला तो कितपत यशस्वी ठरेल, याची शंका वाटते. ग्रॅहम वालासने या तिन्हींचा अंगीकार योग्य प्रमाणात करण्याचीच सूचना केली आहे, परंतु त्याचा तपशील मात्र सांगितलेला नाही.

**सारांश :-** राजकीय तत्वज्ञानाच्या क्षेत्रात जेव्हा मार्क्सवाद, समाजवाद, व्यक्तिवाद आणि लोकशाही तत्वज्ञान व लोकशाही संस्था यांची सर्वत्र चर्चा चालू असतांना मानवी जीवनातील, मानवाच्या राजकीय जीवनातील त्यावरच मानसशास्त्राचा पगडा किती मोठा व परिणामकारक असतो हे वालासने दाखवून दिले एवढेच नव्हे तर राजकीय जीवनातील मानसशास्त्राचे महत्व त्याने पटवून दिले. मानवी जीवनाच्या बाह्य परिस्थितीत कमालीचा बदल झालेला असला तरी मानवाच्या मूलभूत प्रकृतीत मात्र काहीच बदल झालेला नाही. मानवी जीवनावर, मनावर परिणाम करणाऱ्या गोष्टी म्हणजे प्रेम, भीती, उपहास, संपत्तीची अभिलाषा, घृणा, संशय, औत्सुक्य, स्वतःचे मोठेपण मिरविण्याची प्रवृत्ती या होत व या साऱ्यांचा परिणाम मानवाच्या राजकीय वर्तनावर, राजकीय समस्येवर होत असतो, हे ग्रॅहम वालासने दाखवून दिले. संपत्ती, राष्ट्र, राजकीय पक्ष, न्याय, स्वातंत्र्य, हक्क या राजकीय कल्पनांच्या मुळाशी मानवी मानसशास्त्रीय प्रेरणा असतात, हे त्याने सिध्द केले. प्लेटोपासून रूसोपर्यंत अनेकांनी मानवी मनाची ही विकारी बाजू लक्षात घेतली नाही यावरून ग्रॅहम वालासने त्यांच्यावर टीका केलेली आहे, व विविध विचारवंतांमधील दोष त्याने दाखवून दिले आहेत. मानव हा अविवेकी आहे, हे अनेक राज्यशास्त्रज्ञांना खटकत होते. प्लेटो व ॲरिस्टॉटलपासून ते हॉब्जपर्यंत अनेकांनी मानवी विकारांची नोंद घेतलेली आहे. तथापि, लोकशाही, समाजवाद, साम्यवाद, कायदेमंडळे, समित्या, वृत्तपत्रीय चर्चा, कायदे यांच्या गदारोळात मानव हा अविचारीही आहे याचा क्षणमात्र विसर पडेल विचारसरणीच्या समर्थक विचारवंतांना पडला होता की काय असे वाटते त्या काळात ग्रॅहम वालासने मानवी वर्तनातील - राजकीय जीवनावर परिणाम करणारी ही बाजू दाखवून दिली हेच त्याचे महत्वाचे कार्य होय. राजकीय वर्तणुकीचा अभ्यास करण्याची प्रवृत्ती व संख्याशास्त्राचा उपयोग करण्याची प्रवृत्ती ही राज्यशास्त्राच्या अध्ययनात जी हल्ली आढळून येते त्याला ग्रॅहम वालास हा थोडासा कारणीभूत झाला, असे निश्चित म्हणता येईल.

**संदर्भ :-**

१. डॉ.पा.श्री. जोशी : राजकीय विचारांचा इतिहास
२. डॉ. सुधाकर जोशी : पाश्चिमात्य राजकीय विचारवंत
३. Dr.N. Jayapalan : Comprehensive History of Political Thought
४. Dr. D.R. Bhandari : History of European Political Philosophy.



Scanned with CamScanner